**MOUNT CARMEL INTERNATIONAL SCHOOL, AKOLA**

**Cambridge International**

Term End Exam:II Subject: Marathi Date: 01.04.2024

Student's Name:________________________ Roll No:______________Grade: 5

Marks: 35 Time Duration: 120 minutes Invigilator's Sign.

**प्रश्न १. पुढील पठित उतारा वाचून उत्तरे लिहा.** **(१०)**

**अ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.**

१."बाबा देव तुझे बरे करो."

__________________________________________________________________

२."दादा, या आईला जरा बसायला जागा दे रे."

__________________________________________________________________

**ब) कोण ते लिहा.**

१. तिकिटाचे पैसे गोळा करणारा- ________________________________

२. अंगात खाकी शर्ट अडकवणारा- ________________________________

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बसमध्ये काय शिरायला जागा नव्हती?

__________________________________________________________________

२. चामडयाची पिशवी कोणी व कुठे लटकवली?

__________________________________________________________________

**ड) वचन बदला.**

१. पिशव्या ___________________ २. मुंग्या ___________________

**प्रश्न २. पुढील अपठित उतारा वाचून उत्तरे लिहा.** **(८)**

**अ) आकृती पूर्ण करा.**

मुस्लिम बांधवांच्या दोन ईद

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. ईदच्या दिवशी मुस्लिम बांधव काय काय करतात?

२. मुस्लिम बांधव कोणत्या ग्रंथाचे पठण करतात?

**क) एका शब्दात उत्तरे लिहा.**

१. रमजान ईद या दिवशी बनणारा गोड पदार्थ.

२. ईदच्या दिवशी देण्यात येणाऱ्या शुभेच्छा.

**प्रश्न ३.पुढील पद्य वाचून उत्तरे लिहा.** **(८)**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. संध्या काय करीत आहे?

२. आनंदाचा मेघ, संध्या व चित्त यावर काय परिणाम झाला आहे ?

**ब) शब्द शुद्ध करून लिहा.**

१. कौमूदि ____________________ २. स्फूरले ____________________

**क) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. दुःख x ____________________ २. सकाळ x ____________________

**प्रश्न ४. खालील वाक्यातील केवलप्रयोगी अव्यये ओळखा व लिहा. (२)**

१. छी! किती असभ्य वागणूक ! ____________________

२. बापरे! केवढी मोठी रांग ! ____________________

**प्रश्न ५. खालील वाक्यांतील क्रियाविशेषण ओळखा व लिहा. (२)**

१. ती बस वेगाने गेली. ____________________

२. पाऊस जोराजोराने कोसळत होता. ____________________

**प्रश्न ६. पुढील विषयावर भ्रमणध्वनी संदेश तयार करा. (५)**

'मयूर आर्ट कॅलरी'

येथे शनिवारी पक्षांच्या चित्रांचे प्रदर्शन

आयोजित केले आहे.

संध्याकाळी ६ वाजता आर्ट गॅलरीच्या

प्रवेशद्वारा जवळ भेटण्यासंबंधी

मैत्रिणीसाठी भ्रमणध्वनी (S.M.S) तयार करा.

***************************

**Extract (Grade 5)**

## प्रश्न १. पठित उतारा

पहिल्याच सीटवर एक धडधाकट तरुण मुलगा बसला होता. रामने त्याला म्हटले, "दादा, या आईला जरा बसायला जागा दे रे. "तो मुलगा उठून उभा राहिला. म्हातारी त्या जागेवर बसली. ती रामला म्हणाली, "बाबा, देव तुझे बरे करो." राम हसला. त्याने राकेशला म्हटले, "चल रे ," बस सुरू झाली. स्टँडबाहेर आली. रामने घाई घाईने अंगात खाकी शर्ट अडकवला. केबिनमधील चामड्याची पिशवी खांद्यावर लटकवली आणि तो  सगळ्यांकडून पैसे गोळा करण्यासाठी बस मध्ये फिरू लागला. बसमध्ये मुंगी शिरायलासुद्धा जागा नव्हती. तरीदेखील मोठ्या चपळाईने त्या गर्दीतून वाट काढत राम तिकिटाचे पैसे गोळा करू लागला. टपाजवळची आडवी दांडी घट्ट पकडून एका पायावर तोल सांभाळत तो बसच्या मधल्या जागेकडे पोचला.

## प्रश्न २. अपठित उतारा

ईद हा सण मुस्लिम बांधवांचा आवडता सण असतो. तसे तर मुस्लिम बांधव दोनदा ईद साजरी करतात. एक रमजान ईद व दुसरी बकरी ईद. रमजान ईद म्हणजे मोठी ईद होय. हे बांधव ईदपूर्वी एक महिना संपूर्ण दिवस उपवास करतात.

सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतरच जेवण करतात. दिवसभर ते पाणीही पीत नाहीत. त्यालाच 'रोजे ' म्हणतात. या ईदला सगळे मुस्लिम बांधव नवीन कपडे घालतात. डोळ्यात सुरमा लावतात व सकाळी मशिदीत  जाऊन नमाज पढतात. संपूर्ण महिन्यात 'कुराण शरीफ' या पवित्र ग्रंथाचे पठणही करतात. या दिवशी घरात शिरखुर्मा हा खिरीसारखा सारखा गोड पदार्थ बनवितात. या दिवशी हे लोक एकमेकांना ईद मुबारक अशा शुभेच्छा देतात व आपल्या मित्र मंडळींना घरी बोलावून शिरखुर्मा खायला देतात व आनंद साजरा करतात.